प्रेसनोट दिनांक २०/०९/२०१९

## अनधिकृत इंटरनॅशनल कॉल सेंटरवर छापा टाकुन कॉल सेंटर चालविणाऱ्या टोळीचा मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई पोलीसांनी केला पर्दाफाश

.........................................................................................................

सानपाडा, नवी मुंबई येथे एका इमारतीमध्ये अनधिकृत इंटरनॅशनल कॉल सेंटर चालु असलेबाबत मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेस गोपनीय माहिती मिळाली होती. सदर माहिंतीच्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त सो नवी मुंबई, मा.पोलीस सह आयुक्त सो, नवी मुंबई, पोलीस उप आयुक्त श्री. प्रविणकुमार पाटील, गुन्हे शाखा, सहा. पोलीस आयुक्त श्री.अजय कदम गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

दि.१८/०९/२०१९ रोजी मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा, नवी मुंबईच्या म.सपोनि राणी काळे यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत एलोरा फिस्टा टॉवर, ८ वा मजला, ऑफिस नं. ८०३, जुईनगर रेल्वे स्टेशनजवळ, सेक्टर ११, सानपाडा येथे रात्रीचे वेळी अनधिकृत इंटरनॅशनल कॉल सेंटर चालु असलेबाबत माहिती मिळाल्याने त्यानुसार मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी दि. १९/०९/२०१९ रोजी रात्रौ ०१:३० वा. सुमारास सदर ठिकाणी छापा मारला. सदर ठिकाणी मन्सुर अली कासीम शेख हा त्याचे साथीदारांसह कॉन्सीअर्ज हेल्प केअर सोल्युशन सर्व्हिसेस या नावाने रात्रीचे वेळेस कॉलसेंटर चालवित होते. त्या ठिकाणी सदर इसम टेक प्रोसेस या प्रकाराव्दारे इंटरनेटव्दारे कॉल करुन अमेरिकन नागरिकांना त्यांचे कॉम्प्युटरमध्ये गंभीर प्रकारचा व्हायरस असल्याचे भासवून तो व्हायरस तुमचे लॅपटॉप/कॅम्प्युटरमधील डेटा करप्ट होईल अशी भीती दाखवून त्यांचे कॉम्प्युटरचा रिमोट ॲक्सेस स्वत:कडे घेवून त्यांची मदत केल्याचे भासवून त्यांचेकडून पैसे वसूल करुन त्यांची आर्थिक फसवणूक करतात.

तसेच नमूद कॉलसेंटरमधील संगणाकामध्ये अमेरिकन नागरिकांना त्यांचेवर अंमली पदार्थाची तस्करी, मनी लॉन्ड्रींग या संदर्भातील गुन्हे दाखल असून जर त्यांनी फेडरल ऑफिसरला सहकार्य केले नाही तर त्यांना अटक होईल अशी भीती दाखवून अमेरिकन नागरिकांनकडून पैसे वसूल करण्याबाबतची स्क्रिप्ट मिळून आली आहे.

यासंदर्भाने सानपाडा पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. १२७/२०१९ भादवि कलम ४२०, ४१९, ३८४, १२०(ब) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियमचे कलम ६६ (बी), ६६ (सी), ७२(ए), ७५, सह द इंडीयन टेलीग्राफ ॲक्ट कलम २५(अ) अन्वये दि. १९/०९/२०१९ रोजी दाखल असून गुन्हयामध्ये कॉम्पुटरमधील १७ हार्डडिस्क, दोन लॅपटॉप, ६ मोबाईल फोन, रोख रक्कम असा एकुण २,८९,१००/- रू. किंमतीचा मुद्येमाल जप्त करण्यात आलेला आहे.सदर गुन्हयामध्ये खालील इसमांचा सहभाग आढळून आल्याने त्यांना दिनांक १९/०९/२०१९ रोजी अटक करण्यात आलेली असून दिनांक २०/०९/२०१९ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.वाशी कोर्टात हजर करण्यात येणार आहे. आरोपींची नाव/पत्ता पुढीलप्राणे

१)**मन्सुर अली कासीम शेख, वय २९ वर्षे** रा.बी सेक्टर, आय लाईन, चिता कॅम्प , ट्रॉम्बे,मुंबई
२)**मोहम्मद साजीद मो. जुनेद शेख, वय २९ वर्षे,** रा. ए सेक्टर, सी-१ चिता कॅम्प ट्रॉम्बे, मुंबई,
३) **मोहम्मद जहिर साईमोहम्मद शेख,** वय ३२ वर्षे, रा. जी सेक्अर, चिता कॅम्प ट्रॉम्बे, मुंबई,
४) **मोहम्मद फरहान मोहम्मद तसदिक शेख,** वय २८ वर्षे रा. के. सेक्टर,चिता कॅम्प ट्रॉम्बे, मुंबई
५) **मुर्तुझा अख्तर मोटारवाला वय ३० वर्षे,** रा. नबराजश्री बिल्डींग, भारती पार्क मिरारोड, ठाणे

सदरची कामगीरी मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेचे वपोनि एन. बी. कोल्हटकर, सपोनि निलेश तांबे, सपोनि राजेश गज्जल, म.सपोनि राणी काळे, सपोउपनिरी संजय पवार, पोह/सतिश सरफरे, ज्ञानेश्वर बनकर, पोपट पावरा, शशीकांत शेंडगे, पोना/विष्णु पवार, उर्मिला बोराडे, युवराज जाधव, विजय पाटील, नवनाथ कोळेकर, सचिन धनवटे, दिलीप भास्करे, सागर हिवाळे, प्रकाश साळुंखे, मिथुन भोसले, सतिश चव्हाण, पोशि/मेघनाथ पाटील यांनी केलेली आहे. गुन्हयाचा पुढील तपास वपोनि एन.बी. कोल्हटकर हे करीत आहेत.

********